मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# खासदार सुनेत्रा पवार महापालिका आयुक्तांच्या भेटीला

## राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक पदाधिकाऱ्यांसह आयुक्त शेखर सिंह यांची बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड हा अजित पवारांचा बालेकिल्ला मानला जातो. आज याचं पिंपरी चिंचवडमध्ये अजित दादांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवारांना लक्ष घालण्याची वेळ आली आहे. राष्ट्रादी काँग्रेसच्या माजी नगरसेवकांनी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याची सूचना केली आहे. त्यावर अंमलबजावणी करा, अश्या सूचना त्यांनी आयुक्ताना केल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा पिंपरी चिंचवड पालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्यावर दबाव असू शकतो. मात्र, आमचे अजित दादा उपमुख्यमंत्री आहेत. त्यामुळे आमचा ही दबाव आयुक्तांवर असायला हवा. असे स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्याचे मत आहे. त्याबाबत पक्षात नाराजीचा सूर आहे. त्या अनुषंगाने सुनेत्रा पवारांनी आज महापालिका आयुक्तांना अर्थसंकल्पात राष्ट्रवादी काँग्रेसने सांगितलेल्या कामांची तरतूद करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.



21 फेब्रुवारीला सादर झालेल्या महापालिकेच्या अर्थसंकल्पत आयुक्तांनी भाजपला झुकतं माप दिले, असा राष्ट्रवादीचा आरोप आहे. तसाच न्याय मिळावा म्हणून स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेसने हा खटाटोप केला आहे. यानिमित्ताने भाजप-राष्ट्रवादीत बजेटसाठी चढाओढ सुरु झाली आहे.

या बैठकीला राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, महिला अध्यक्ष कविता आल्हाट, माजी महापौर मंगला कदम, अपर्णा डोके, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, राजू मिसाळ, श्याम लांडे, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, नारायण बहिरवाडे, प्रशांत शितोळे, अतुल शितोळे, राजेंद्र जगताप, प्रसाद शेट्टी, राजू बनसोडे, विनोद नढे, संतोष कोकणे, माजी नगरसेविका माई काटे, माया बारणे, पक्षप्रवक्ते फजल शेख, वर्षा जगताप यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### बजेटमध्ये भाजपलाच 'झूकते माप'

» राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी चिंचवड मध्ये २०१७ च्या महापालिका निवडणुकीत सत्तांतर झाले. तेव्हापासून महापालिकेत भाजपाचे निर्विवाद वर्चस्व राहिले आहे. दरम्यान विधानसभा निवडणुकीनंतर राज्यातील राजकीय समीकरण बदलले असून राष्ट्रवादी, भाजप आणि शिवसेना या महायुतीची सत्ता आली आहे. असे असताना नुकत्याच झालेल्या महापालिकेच्या बजेटमध्ये भाजपचाच वरचष्मा पाहायला मिळाला. भाजपाचे आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे आणि उमा खापरे यांनी आपली ताकद लावून या अर्थसंकल्पात झुकते माप स्वतःच्याच पारड्यात टाकून घेतले आहे.

### राष्ट्रवादीचाही आयुक्तांवर दबाव हवा..

राज्यात महायुतीची सत्ता असली तरी स्थानिक पातळीवर कामे करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्यावर दबाव असू शकतो. परंतु आमचे अजितदादा उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री सुद्धा आहेत, त्यामुळं आमचा ही दबाव आयुक्तांवर असायला हवाच असं स्थानिक राष्ट्रवादीचं म्हणणं होतं. अजितददांवर पक्ष आणि राज्याची जबाबदारी असल्यामुळे खासदार सुनेत्रा पवार यांना शहरातील राजकारणात आता लक्ष घालण्याची वेळ आली आहे. त्याच अनुषंगाने खासदार सुनेत्रा पवार यांनी आज महापालिका आयुक्तांसमवेत बैठक घेऊन बजेटमध्ये राष्ट्रवादीने सांगितलेल्या कामांची तरतूद करावी, अशा सूचना दिल्या आहेत.

# नाशिक महामार्गावरील अतिक्रमणांवर तिसऱ्या दिवशी कारवाई

## पीएमआरडीएने पुणे-नाशिक महामार्गावर तिसऱ्या दिवशी सव्वादोनशे बांधकामे जमीनदोस्त केली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड आणि पुणे शहरालगतची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अतिक्रमणे हटवण्याचा धडाका सुरू करण्यात आला आहे. या कारवाईत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) पुणे-नाशिक महामार्गावर दुसऱ्या दिवशी ४५०, तर तिसऱ्या दिवशी बुधवारी (ता.५) सव्वादोनशे बांधकामे जमीनदोस्त केली आहेत.




वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नाशिक महामार्गावर ३० दिवसांत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेले अनधिकृत व अतिक्रमित दुकाने, गाळे, बांधकामे हटवली जाणार आहेत. याबाबत पीएमआरडीए, पुणे महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, स्थानिक पोलीस विभाग, एमएसआरडीसी, सार्वजनिक बांधकाम विभागासह इतर विभागांनी संयुक्त कारवाईसाठी वेळापत्रक निश्चित केले होते. पहिल्याच दिवशी सोमवारी (ता.३) २०१, मंगळवारी ४५० आणि बुधवारीही कारवाई केली.

यामध्ये कच्चे बांधकाम, सुरक्षा भिंत, पत्र्याचे गोदाम तसेच काही टपऱ्यादेखील हटवण्यात आल्या. एकूण जवळपास ४५ हजार ३०० चौरस फूट रस्ता मोकळा करण्यात आला. महामार्ग, राज्य मार्गालगतची दुकाने, पत्राशेड, गाळे, टपरी व अनधिकृत बांधकामे संबंधितांनी स्वत:हून काढून घ्यावीत, असे आवाहन 'पीएमआरडीए'ने केले आहे.

# दररोज मेट्रोमध्ये दीड लाख पुणेकर..!

## पुणे मेट्रोला तीन वर्षे पूर्ण : पुणे मेट्रोची दररोजची सरासरी प्रवासी संख्या सुमारे 1 लाख 60 हजार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेमेट्रोला तीन वर्ष पूर्ण झाले असून, पुणेकरांना पर्यावरणपूरक, आरामदायी आणि प्रदूषणविरहित प्रवास करण्याचा आनंद मिळत आहे. दैनंदिन प्रवासी संख्येतही वाढ होत असून, सध्या दीड लाखांहून अधिक पुणेकर मेट्रोचा वापर करत आहेत.

पुणे मेट्रोची सुरवात ६ मार्च २०२२ रोजी सुरू झाली. त्यानंतर आपल्या नेटवर्कचा विस्तार करून, पुणेकरांसाठी एक वेगवान, कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक वाहतूक पर्याय उपलब्ध करून दिला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उद्घाटनानंतर दोन प्रारंभिक मार्गांसह, पीसीएमसी ते फुगेवाडी आणि वानझ ते गरवारे कॉलेज या मार्गावर मेट्रो सेवा सुरू झाली. पुणे मेट्रोच्या सुरुवातीच्या काळात २१ लाख ४७ हजार ७५७ प्रवासी होते (मार्च २०२२ ते जुलै २०२३ पर्यंत).



त्यानंतर १ ऑगस्ट २०२३ रोजी फुगेवाडी ते जिल्हा न्यायालय, जिल्हा न्यायालय ते रूबी हॉल क्लिनिक आणि गरवारे कॉलेज ते जिल्हा न्यायालय या मार्गिकांच्या उद्घाटनानंतर प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आणि १ कोटी २३ लाख २० हजार ०६७ झाली. रूबी हॉल क्लिनिक ते रामवाडी या विस्तारामुळे प्रवासी संख्येत आणखी वाढ झाली. पुणे मेट्रोची दररोजची सरासरी प्रवासी संख्या सुमारे १ लाख ६० हजार आहे.

**फेज-२ (नवीन मार्गिका)**

वनाज ते चांदणी चौक (१.१२ किमी, २ स्थानके)

रामवाडी ते वाघोली/विठलवाडी (११.६३ किमी, ११ स्थानके)

खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खाराडी (३१.६४ किमी, २८ स्थानके)

नळ स्टॉप ते वारजे - माणिकबाग (६.१२ किमी, ६ स्थानके

हडपसर ते लोणी काळभोर (१६.९२ किमी, १४ स्थानके) आणि हडपसर ते सासवड रस्ता (५.५७ किमी, ४ स्थानके)

(भारत सरकारकडून अंतिम मंजुरीच्या प्रतीक्षेत)

### प्रवाशांसाठी सुविधा ...!

» पुणे मेट्रो उच्च सुरक्षा मानकांसह आरामदायक, वातानुकूलित प्रवास देत असून, सीसीटीव्ही देखरेख, कोचमध्ये पॅनिक बटन्स, चांगल्या प्रकाशमान स्थानक क्षेत्रे, बॅगेज स्कॅनिंग सुविधा उपलब्ध करून दिली.

### भविष्यातील मार्गिका ..!

» फेज-१ आणि विस्तारांमध्ये, पीसीएमसी ते स्वारगेट आणि वनाज ते रामवाडी या मार्गांचा (३३.१ किमी) आधीच कार्यप्रणालीत आहे, तर पीसीएमसी ते निगडी विभाग सध्या बांधकामाधीन आहे. याआधी स्वारगेट ते कात्रज विस्तार (५.५ किमी) टेंडर प्रक्रियेत आहे.

> पुणे शहरात सुरक्षित, वेगवान, आरामदायक, विश्वासार्ह आणि टिकाऊ शहरी वाहतूक उपलब्ध करुन देण्यात पुणे मेट्रोने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. पुणे मेट्रो विस्तारित मार्ग आणि फेज-२ मेट्रो नेटवर्कवर शहराचा जास्तीत जास्त भाग जोडला जाईल.
>
> - श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महा मेट्रो.

# स्वारगेट बसस्थानकाबाहेर ‘आरटीओ’ची कारवाई!

## बसस्थानकाच्या 200 मीटर परिसरात खासगी वाहन उभे केल्यास कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

स्वारगेट बस स्थानकातील तरुणीवर अत्याचाराच्या घटनेनंतर सुरक्षिततेच्या अनुषंगाने उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या (आरटीओ) वायूवेग पथकाकडून बस स्थानकाबाहेरील २०० मीटर स्थानकाच्या परिसरात कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. स्थानकांच्या बाहेरील खासगी प्रवासी बसचालक, रिक्षाचालक आणि इतर प्रवासी अशा २० वाहनचालकांवर कारवाई करून एक लाख ४८ हजारांहून अधिक दंड वसूल करण्यात आला आहे. दरम्यान, शिवाजीनगर आणि इतर आगारांच्या ठिकाणीही याप्रमाणे कारवाई करण्यात येणार असल्याचे ‘आरटीओ’कडून स्पष्ट करण्यात आले.



स्वारगेट बस स्थानकात तरुणीवर अत्याचाराची घटना घडल्यानंतर बस स्थानकामध्ये आणि परिसरात खासगी बसचालक, रिक्षाचालकांचा बिनदिक्कत प्रवेश होत असून, सुरक्षिततेत अनेक अडचणी येत असल्याचे समोर आले होते. दरम्यान, याबाबत स्वारगेट बस स्थानकाच्या आगारप्रमुखांनीदेखील याबाबत वेळोवेळी पोलीस आणि आरटीओ प्रशासनाला पत्र पाठवून कारवाई करण्याबाबत कळवले. याबाबत कुठलीच कार्यवाही झाली नसल्याने वाहतूक पोलिसांच्या आणि आरटीओ प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. त्यामुळे ‘आरटीओ’कडून सोमवारपासून स्वारगेट बस स्थानकाच्या २०० मीटर हद्दीपर्यंतच्या परिसरात उभ्या असणाऱ्या खासगी प्रवासी बस आणि रिक्षाचालकांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

कारवाईमध्ये क्रमांक तीनच्या वायूवेग पथकाकडून बस स्थानकाबाहेर उभ्या असणाऱ्या खासगी प्रवासी बसच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. तसेच, ‘परमिट’ परवाना, वाहनचालक परवाना, गणवेश आणि इतर नियमांनुसार तपासणी करण्यात आली. यामध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने तपासणी करण्यात आली असून, २० प्रवासी वाहनांमध्ये कागदपत्रांपासून अनेक त्रुटी असल्याचे तपासणीमध्ये समोर आले. वायूवेग पथकाकडून दंडात्मक कारवाई करून एक लाख ४८ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला असल्याची माहिती ‘आरटीओ’च्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

> महाराष्ट्र राज्य मार्ग पहिवहन महामंडळाच्या (एसटी) स्थानक परिसरात खासगी प्रवासी वाहनधारकांना २०० मीटर हद्दीत येण्यास मज्जाव आहे. सुरक्षिततेच्या अनुषंगाने स्वारगेट परिसरात वायूवेग (क्रमांक तीन) पथकाकडून २० वाहनांवर कारवाई करण्यात आली. इतर बस स्थानकांबाहेरही कारवाई करण्यासाठी वायूवेग पथकांना आदेश देण्यात आले आहेत.
>
> - स्वप्नील भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.

# एलबीटीची अजूनही बारा हजार प्रकरणे प्रलंबित

## राज्य शासनाकडून 30 एप्रिलपासून एलबीटी विभाग बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या स्थानिक संस्था कर (एलबीटी) विभागाच्या वतीने शहरातील व्यापारी आणि व्यावसायिक कंपन्यांची हिशोब तपासणी दहा वर्षांपासून सुरू आहे. प्रलंबित असलेल्या ५७ हजार पैकी ४५ हजार ४८३ प्रकरणाची तपासणी करण्यात आली आहे. त्यामधून महापालिकेला सुमारे ६ हजार ५५७ कोटी ८२ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. मात्र, राज्य शासनाकडून ३० एप्रिलपासून एलबीटी विभाग बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

त्यामुळे महापालिकेला एलबीटीच्या वसुलीतून अपेक्षित असणारे कोट्यवधीचे उत्पन्न बुडण्याची शक्यता आहे. यंदाच्या अंदाजपत्रकातही महापालिकेने दोनशे कोटी वसुलीचे लक्ष्य ठेवले आहे. तसेच ३० जून २०१७ ला एलबीटी बंद झाला असून अजूनही पालिकेच्या एलबीटी या विभागात एकूण २३ अधिकारी आणि कर्मचारी कार्यरत आहेत. दुसरीकडे महापालिकेने आता एलबीटीचा हट्ट सोडावा आणि व्यावसायिकांनी त्रास देऊ नये, अशी मागणी व्यावसायिक आणि औद्योगिक संघटनांकडून अनेक दिवसांपासून होत आहे.

शहरातील नागरिक, व्यावसायिक, व्यापारी व कंपन्यांनी आपल्या व्यवसायाची नोंद केलेली आहे. अशा नोंदणीकृत व्यापारी व व्यावसायिकांची महापालिकेच्या एलबीटी विभागामार्फत खासगी चार्टर्ड अकाउंटन्टकडून प्रलंबित प्रकरणाची तपासणी करण्यात येत आहे. व्यापारी व व्यावसायिक विविध कारणास्तव त्यांच्याकडील थकीत कर भरण्यास उदासीनता दाखवित आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात महसूल थकीत आहे. त्यांना वारंवार नोटीसही बजावण्यात आल्या आहेत. अनेकांची बँक खाती देखील सील करण्याबरोबर, त्यांच्यावर पाच हजार रुपये दंडात्मक कारवाई ही केली आहे.

प्रलंबित ५७ हजार पैकी ४५ हजार ४६३ प्रकरणाची तपासणी करण्यात आली आहे. त्यातून सुमारे २ हजार ८०३ कोटी २१ लाख ९८ हजार २२० रुपये इतका एलबीटी थकीत आहे. त्याचे व्याज आणि दंड धरून सुमारे ६ हजार ५५७ कोटी ८२ लाख २२ हजार १५८ रुपये थकबाकी आहे. दरम्यान, एलबीटी विभाग ३० एप्रिल २०२५ पासून कायमचा बंद करावा. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनाला सादर करावा, असे आदेश महापालिका आयुक्तांना दिले आहेत. त्यामुळे महापालिकेचे कोट्यवधीचे उत्पन्न बुडण्याची शक्यता आहे.




### एलबीटीला व्यापाऱ्याचा विरोध

» स्थनिक कराच्या उत्पन्नात महापालिकेस शहराचा विकास करता यावा, यासाठी जकात वसुली करण्यात येत होती. साधारणपणे १९७१ पासून ते ३१ मार्च २०१३ पर्यंत जकात वसुली सुरु होती. राज्य शासनाने जकात वसुली बंद करुन १ एप्रिल २०१३ पासनू एलबीटी कर सुरु केला. एलबीटीला व्यापाऱ्यांनी विरोध दर्शविला. शासनाने ३० जून २०१७ ला एलबीटी बंद करुन महापालिकेला जमा होणाऱ्या वस्तू आणि सेवाकर (जीएसटी) तून ठराविक निधी देण्यास सुरुवात केली आहे.

### आकडे काय सांगतात?

» एकूण नोंदणीकृत व्यापारी – ३५,८९२
» विविरणपत्र दाखल न केलेले व्यापारी – १०,०५७

> महापालिकेच्या एलबीटी विभागात मनुष्यबळ अपुरे आहे. सद्यस्थितीत एलबीटीधारकांच्या वसुली संदर्भात कामकाज सुरु आहे. बाह्य यंत्रणेकडून एलबीटीच्या प्रलंबित प्रकरणाची तपासणी सुरु आहे. कर्मचारी कमी व प्रलंबित प्रकरणे अधिक असल्याने वेळेत वसुली होत नाही. चालु वर्षी २०० कोटी रुपये वसुलीचे उद्दिष्ट आहे. तसेच, शासनाला एलबीटी वसुलीसाठी अभय योजनेचा प्रस्ताव सादर केला आहे. तो अद्याप प्रलंबित आहे.
>
> -सीताराम बहुरे, उपायुक्त, एलबीटी विभाग.

# 15 वर्षावरील वाहनांच्या पुर्ननोंदणी शुल्कात दुप्पटीने वाढ

## वाहन भंगारात काढल्यास नवीन वाहन खरेदीत सरकारकडून वाहनांच्या किमतीवर 10 टक्के सवलत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंद असलेल्या एकूण वाहनांची संख्या सुमारे २४ लाख आहे. यात १५ वर्षावरील वाहनांची संख्या ही सुमारे ५ लाख इतकी आहे. रस्ते व परिवहन मंत्रालयाने १५ वर्षावरील वाहनांसाठी पुर्ननोंदणी शुल्कात मोठी वाढ केली आहे. त्यात नोंदणी शुल्कात आताच्या तुलनेत दुप्पट वाढ केली असल्याने जुने वाहन चालविणे अनेकांना महागात पडू शकते.

वर्षाला दोन लाख नव्या वाहनांची भर पडणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरात जुन्या वाहनांची संख्यादेखील वाढली आहे. सद्यःस्थितीत पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे पाच लाख वाहनांच्या आयुर्मान १५ वर्षपेक्षा अधिक आहे. वाहनांची संख्या लक्षात घेता निर्लेखित केंद्रांच्या (स्क्रैप सेंटर) संख्येतही वाढ केली जात आहे. सद्य स्थितीत ३ केंद्र असून, लवकरच एका नव्या केंद्राला मंजुरी मिळणार आहे.

रस्ते व परिवहन मंत्रालयाने १५ वर्षावरील वाहनांसाठी पुर्ननोंदणी शुल्कात मोठी वाढ केली आहे. नुकतेच त्या संबंधीचा सूचना पत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यामुळे जुने वाहन चालविणे आता अनेकांना परवडणार नाही. १५ वर्षांवरील वाहने नोंदणीकृत केंद्रात भंगारात दिल्यावर वाहन मालकांना चांगला मोबदला मिळेल. त्यामुळे जुनी वाहने भंगारात काढणे अथवा जास्तीचा कर भरणे हे दोन पर्याय वाहनधारकांकडे उपलब्ध असणार आहेत.



### नवीन वाहन खरेदीत 10 टक्के सवलत

» १५ वर्षांवरील वाहने नोंदणीकृत केंद्रात भंगारात दिल्यावर वाहन मालकांना चांगला मोबदला मिळेल. शिवाय त्यांना एक प्रमाणपत्र देखील दिले जाते.नवीन वाहन खरेदी करताना ते प्रमाणपत्र वाहन विक्रेत्याला दाखविल्यास सरकारकडून वाहनांच्या किमतीवर १० टक्के सवलत दिली जात आहे. जुन्या वाहनांच्या बदल्यात चांगली रक्कम व नवीन वाहन घेताना आर्थिक सवलत असा दुहेरी फायदा वाहनधारकांचा होणार आहे.

### दोनशे वाहने होणार निर्लेखित

» स्वारगेट बसस्थानकावर शिवशाही बसमध्ये तरुणीवर अत्याचाराची घटना घडली. त्यानंतर परिवहनमंत्र्यांनी १५ एप्रिलपर्यंत आयुर्मान संपलेली वाहने निर्लेखित करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पिंपरी-चिंचवड आरटीओने २०० वाहनांचे निर्लेखित करण्याचे ठरविले आहे. यात ६० रिक्षा असून, चारचाकी व दुचाकी स्वरूपाची वाहने आहेत.

> पिंपरी-चिंचवडमधील वाहनांची संख्या लक्षात घेता, स्क्रैप सेंटरमध्ये वाढ केली जात आहे. वाहनधारकांनी १५ वर्षांवरील वाहने स्क्रैप केल्यास त्यांना आर्थिक सवलत दिली जात आहे.
>
> - संदेश चव्हाण, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड

# शाळा एप्रिलअखेरपर्यंत, परीक्षेच्या वेळापत्रकावर आक्षेप

**पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या संकलित मूल्यमापन चाचणी २चे वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने जाहीर केले आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांतील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या संकलित मूल्यमापन चाचणी २चे वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) जाहीर केले आहे. त्यानुसार ८ ते २५ एप्रिल या कालावधीत ही चाचणी होणार आहे. त्यामुळे राज्य मंडळाच्या सर्वच शाळांतील परीक्षा एकाच वेळी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, परीक्षा एप्रिलअखेरीस होणार असल्याने या वेळापत्रकावर आक्षेप घेण्यात आला असून, इतक्या उशिरा परीक्षा झाल्यास १ मे रोजी निकाल जाहीर कसा करणार, असा प्रश्न शिक्षण क्षेत्रातून उपस्थित करण्यात येत आहे.



एससीईआरटीने दिलेल्या सूचनांनुसार शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि खासगी अनुदानित शाळांना नियतकालिक मूल्यमापन चाचणीअंतर्गत तिसरी ते नववीसाठी प्रथम भाषा, गणित आणि तृतीय भाषा (इंग्रजी) या विषयांसाठी संकलित मूल्यमापन चाचणी २च्या प्रश्नपत्रिका पुरवण्यात येतील. इतर व्यवस्थापनाच्या शाळांनी सर्व प्रश्नपत्रिका शाळास्तरावर तयार करायच्या आहेत. पहिली ते दुसरीसाठी सर्व विषयांच्या आणि तिसरी ते नववीच्या अन्य विषयांच्या संकलित चाचणी २ लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका शाळास्तरावर विकसित करून प्रचलित पद्धतीने मूल्यमापन करावे. नववीसाठी नियतकालिक मूल्यमापन चाचणीशिवाय अन्य विषयांचे वेळापत्रक शाळास्तरावर ठरवण्यात यावे. पाचवी आणि आठवीच्या वार्षिक परीक्षांसाठी शाळांनी सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिका तयार करून परीक्षा घ्यायची आहे. नियतकालिक मूल्यमापन चाचणी ३ अंतर्गत दिलेल्या प्रश्नपत्रिका वार्षिक परीक्षा म्हणून वापरता येणार नाहीत. पाचवी आणि आठवीवगळता अन्य कोणत्याही इयत्तांसाठी दुबार परीक्षा होणार नाही. तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षा त्या त्या दिवशी लेखी परीक्षेनंतर घ्यावी. संकलित चाचणी २मध्ये परीक्षेच्या दिवशी विद्यार्थी गैरहजर असल्यास तो शाळेत हजर झालेल्या दिवशी परीक्षा घ्यावी. राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांचा निकाल महाराष्ट्र दिनी (१ मे) ध्वजारोहणानंतर जाहीर करावा, २ मेपासून शाळांना उन्हाळी सुटी सुरू होईल. या सूचना राज्य मंडळाव्यतिरिक्त शाळांना लागू असणार नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी या वेळापत्रकावर आक्षेप नोंदवला. ते म्हणाले, की संकलित मूल्यमापन चाचणी घेण्याचे वेळापत्रक शाळांना त्यांच्या स्तरावर ठरवण्याची मुभा असायला हवी. सर्वसाधारणपणे १५ एप्रिलनंतर पालकांचे विद्यार्थ्यांसह गावी जाण्याचे नियोजन असते. त्याशिवाय २५ एप्रिलपर्यंत परीक्षा घेतल्यास जास्त विद्यार्थिसंख्या असलेल्या शाळांमध्ये उत्तरपत्रिका तपासणी, निकाल तयार करणे, ऑनलाइन माहिती भरणे हे कामकाज करण्यासाठी वेळच मिळणार नाही. दहावी-बारावीच्या परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये घेऊन निकाल मे-जूनमध्ये जाहीर होतो, तर बाकी वर्गांसाठी परीक्षा आणि निकालासाठी वेळ मिळायला हवा.

### राज्यातील शाळांमध्ये एकवाक्यता आवश्यक


» राज्यातील पहिली ते नववीच्या परीक्षा साधारणपणे मार्चच्या अखेरीस किंवा एप्रिलमध्ये शाळा स्तरावरून घेतल्या जातात. एप्रिलच्या सुरुवातीलाच वार्षिक परीक्षा झाल्यास त्यानंतरच्या कालावधीत शाळा सुरू असल्या, तरी विद्यार्थी उपस्थिती पुरेशी असत नाही. अशा पद्धतीने वर्षाअखेरीस परीक्षा आयोजित करण्याऐवजी लवकर केल्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी मिळणारा कालावधी कमी होतो. तसेच, प्रत्येक शाळेचे वेळापत्रक वेगवेगळे असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे राज्यातील सर्व शाळांमध्ये एकवाक्यता असावी, उपलब्ध वेळेचा पुरेपूर उपयोग विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी व्हावा, यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एससीईआरटी) संचालकांनी राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पहिली ते नववीच्या वार्षिक परीक्षा, संकलित चाचणी २ आणि नियतकालिक मूल्यांकन २०२४-२५ यासाठी वेळपत्रक जाहीर केले आहे. या वेळापत्रकानुसार परीक्षांचे आयोजन होईल, या दृष्टीने कार्यवाही आणि नियोजन करावे. स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन नियोजनात बदल करायचा असल्यास शिक्षणाधिकाऱ्यांनी एससीईआरटी संचालकांची परवानगी घेऊनच बदल करावा, असे निर्देश शिक्षण आयुक्तालयाने दिले आहेत.

# बॅटरीचा करंट देऊन बैल पळवल्याचा घृणास्पद प्रकार उघड

**बैल जोरात पळण्यासाठी त्याला इलेक्ट्रिक बॅटरीचा करंट देऊन पळवले जात असल्याचा प्रकार निघोटवाडी (ता. आंबेगाव) येथील घाटात उघडकीस आला**

**पुणे | प्रतिनिधी**

बैलगाडा घाटात बैल जोरात पळण्यासाठी बैलगाडा मालकाची बारी बसण्यासाठी बैलांना इंजेक्शन, उत्तेजक द्रव्य देण्याचे प्रकार या अगोदर घडले आहेत. मात्र, आता बैल जोरात पळण्यासाठी त्याला इलेक्ट्रिक बॅटरीचा करंट देऊन पळवले जात असल्याचा प्रकार निघोटवाडी (ता. आंबेगाव) येथील घाटात उघडकीस आला असून बैलाबाबत असे चुकीचे कृत्य करणाऱ्यांना आंबेगाव तालुक्याच्या कुठल्याही घाटात गाडा पळवून दिला जाणार नाही, असा निर्णय आंबेगाव तालुका अखिल भारतीय यात्रा कमिटीच्या वतीने घेण्यात आला आहे.



बैलगाडा शर्यतीत बैलांना काठीने, चापकाने मारहाण होते.त्यांना उत्तेजक द्रव्य दिले जाते. अनेकदा घाटात बैलाचा अपघात होऊन बैल मृत्युमुखी देखील पडतो. त्यामुळे काही वर्षांपूर्वी बैलगाडे पळवण्यावर बंदी घालण्यात आली होती. दहा-बारा वर्ष मोठे प्रयत्न करून बैलगाडा मालक अनेक राजकीय नेत्यांनी पाठपुरावा करून बैलगाडा शर्यत सुरू केली. मात्र, बैलगाडा शर्यतीत आता पुन्हा बैलांना त्रास दिला जात असून असाच त्रास सुरू राहिला तर पुन्हा बैलगाडा शर्यत बंद पडेल.अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

निघोटवाडी ता.आंबेगाव येथे एका बैलगाडा मालकाने बैल जोरात पळण्यासाठी त्यांना बॅटरीचा करंट देण्याचा प्रकार घडला.त्यावेळी अखिल भारतीय यात्रा कमिटीचे पदाधिकारी आक्रमक झाले होते. यापुढील काळात असे गैर कृत्य करणाऱ्यांना आंबेगाव तालुक्यातील घाटात गाडा पळून दिला जाणार नाही व त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल, असा इशारा दिला आहे. अनेक शेतकरी बैलगाडा मालक पळणाऱ्या बैलांची पोटच्या मुलासारखी काळजी घेतात.त्यांना घरी वेगवेगळ्या खुराक खायला घालतात. तर काही बैलगाडा मालक स्वतःच्या नावासाठी घाटात बारी बसण्यासाठी बैलांना वेगवेगळे इंजेक्शन देतात.

असे प्रकार करणे चुकीचे आहे. बैलांना कोण डॉक्टर चुकीचे इंजेक्शन देत असेल तर त्या डॉक्टरचा देखील समाचार घेतला जाईल.बैलगाडा ही जुनी परंपरा आहे.ती आपल्याला टिकवायचे आहे.खानदानी बैलगाडा मालक बैलांना त्रास देत नाही.त्यामुळे यापुढील काळात बैलगाडा मालकांनी काळजी घ्यावी.असे आवाहन पुणे जिल्हा बैलगाडा चालक मालक संघटनेचे संस्थापक / अध्यक्ष जयसिंग एरंडे यांनी केले.

> “ निघोटवाडी घाटात बॅटरीच्या साह्याने बैलाला करंट देताना स्वयंसेवकांनी पाहिले आणि लगेचच आम्ही ग्रामस्थ म्हणून दखल घेऊन कार्यवाही केली. तो बैलगाडा इनामात धारला नाही आणि त्याचे सेकंदही पुकारले नाही. यापुढे असे कृत्य सहन केले जाणार नाही. नाहीतर कायदेशीर कारवाई करावी लागेल.
>
> - शिवाजीराव निघोट, प्रसिद्ध बैलगाडा मालक, माजी सरपंच निघोटवाडी.

> “ बैलगाडा मालकांनी बैल पळण्यासाठी कोणतेही उत्तेजक पदार्थ देऊ नये.चांगल्या प्रकारे आहार देऊन बैल पळताना आनंद घेतला पाहिजे. जर चुकीचे कृत्य झालं आणि कोर्टात कोणी गेलं तर बंदी येईल.याची काळजी सर्वांनी घ्यावी.प्रत्येक बैलगाडा मालकांनी प्रामाणिकपणे बैलांशी वागून आपले नाव कमवावे,गमवू नये.
>
> - रामकृष्ण टाकळकर, अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे प्रमुख.